नियमित दिवाणी दावा क्र.११६/२०२४
निशाणी क्र.     लगत.

## वादी तर्फे साक्षीदार क्र.०१

| | | |
|---|---|---|
| नाव | – | अंजु गोपालसिंग राजपुत, |
| वय | – | ४२ वर्षे, |
| धंदा | – | शेती, |
| राहणार | – | महाराणा प्रताप नगर, पाल, ता.फुलंब्री आणि जि. औरंगाबाद. |

---

## सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. गायकवाड यांच्यातर्फे

माझे सासरे रुस्तमसिंग जालनसिंग राजपुत यांनी मला माझ्या हक्कात मुक्यातर पत्र नि.क्र.२२ वर करुन दिले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी दि.३०.०५.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.२, ३ यांच्याविरुध्द पोलीस ठाणे फुलंब्री येथे लेखी तक्रार दिली होती. त्याची साक्षांकित प्रत मला दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. ती नि.क्र.२६ वर आहे.

**सरतपास पुर्ण....**

## उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एन.बी.सोनवणे यांच्यातर्फे

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सास–याने सदर दावा दाखल केला तो मी सगळा समजुन घेतला. मी जो मुक्तीयार पत्र दाखल केले त्याची मुळ दाव्यामध्ये सुधारणा केली आहे. साक्षीदाराला मुळ दावा दाखवल्यावर स्वतः सांगते की, तिने मुक्तयार पत्रामध्ये सुधारणा करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मााझे सासरे रुस्तुमसिंग  हे आजही शेती करतात. माझ्या सास–यांना ऐकयला येत नाही याबाबत मी वैदयकीय प्रमाणपत्र दाखल केले नाही. साक्षीदार स्वतः सांगते की, तिच्या सास–यांना कोणी काही विचारलेले त्यांना समजत नाही. त्याबाबतचे कोणतेही उपचार चालु असल्याबाबत कागदपत्र दाखल केले नाही. मुक्तयार पत्राचा बॉण्ड मी स्वतः घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर बॉण्ड मी स्वतःसाठी घेतला होता. मी नोटरी करतांना माझ्या सास–यांचे व माझे आधार कार्ड दिले होते. हे म्हणणे खरे

आहे की, मुकत्यार पत्रावर साक्षीदार ओळख म्हणुन माझ्या वकीलांचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, नोटरीवर माझ्या सास–यांचा अंगठा आहे त्यावर ओळख म्हणुन कोणी सही केली नाही. ज्या वकीलांकडुन मी नोटरी केली आहे त्याव वकीलांनी मी साक्षीसाठी न्यायालयात आणु शकते. हे म्हणणे खरे नाही की, मी व वकीलांनी मिळुन माझे सासरे हजर नसतांना खोटे मुकत्यार पत्र बनवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी मुळ दाव्यात सुधारणा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मुकत्यार पत्राद्वारे मला साक्ष देण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.४५५ हे माझे सासरे व चुलत सासरे यांची वडीलोपार्जीत मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.४५५ मधील २ गुंठे जमीन रुपेश मन्नुलाल जैस्वाल यांना विहीरीसाठी विक्री केली होती. मी गट क्र.४५५ चा ७/१२ उतारा बघितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४५५ चा चतुःसिमा नमुद केल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, अमाच्या गट क्र.४५५ ला लागुन विठ्ठलसिंग जोनवाल आणि पुनमसिंग जोनवाल यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, भुमि अभिलेख कार्यालयावरील नकाशावर खाडाखोड  केली आहे. ज्या अधिका–यांनी मला सदर नकाशा दिला त्यांना साक्षी पुराव्यासाठी मी न्यायालयात आणु शकते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांची गट क्र.३८८ मध्ये जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ रामदास जाधव यांनी बाबरा नदीतुन २०१५ ला विहीर खोदयासाठी शासनाची परवानगी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, बाबरा नदीतील विहीरीपासुन पाईपलाईन घेवुन गट क्र.३८८ ला पाणी पुरवले. हे म्हणणे खरे नाही की, रामदास जाधव यांनी माझे पती व माझे सासरे बाबत ते विहीरीबाबत वाद करतात म्हणुन पोलीस ठाण्यात व तहसिल कार्यालयात तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर तक्रारीवरुन पोलीसांनी माझ्या पतीवर प्रतिबंधक कार्यवाही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याच्या अर्जावरुन तलाठी मंडळ अधिकारी यांनी विहीरीवर येवुन पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, परिच्छेद क्र.१० मधील मजकुर मी खोटा लिहिला आहे. हे म्हणणे खरे आहे  की, परिच्छेद क्र.११ मधील मजकुर खोटा आहे. माझ्या सास–यांनी गट क्र.४५५ मध्ये विहीर खोदयासाठी शासनाची  लेखी परवानगी घेतली नाही. आमच्यात व प्रतिवादी क्र.१ मध्ये विहीर खोदण्याकरीता कुठल्याही लेखी करारनामा झाला नव्हता. माझ्या सास–यांनी प्रतिवादी क्र.१ ला

आडीच लाख रुपये दिल्याबाबत लेखी कागदपत्र मी सादर केले नाही. साक्षीदार स्वतः सांगते की, तिच्या सास–यांनी अडीच लाख रुपये तिच्या समक्ष प्रतिवादी क्र.१ ला दिले होते. मी सदरबाब माझ्या मुळ दाव्यात व शपथपत्रामध्ये नमुद केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष माझ्या सास–यांनी प्रतिवादी क्र.१ अडीच लाख रुपये दिले नव्हते, त्यामुळे मी सदरबाब आमच्या मुळ दाव्यात व माझ्या शपथपत्रात नमुद केले नाही. माझ्या सास–यांनी वाद विहीरीवर मोटर बसवण्याकरीता परवानगी घेतल्याबाबत कुठलेही कागदपत्र मी अभिलेखावर दाखल केलेले नाही. मी व माझ्या सास–यांनी गट क्र.४५५ विहीरीची नोंद करण्याकरीता तहसिलदार व तलाठयाला लेखी अर्ज केला नाही. साक्षीदार स्वतः सांगते की, प्रतिवादींनी त्यांना सदर विहीरीची नोंद करण्याकरीता लेखी अर्ज देवु दिला नाही.

**(इतर कामकाज असल्यामुळे वादी यांचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.)**

श्रवणोत्तर स्विकृत,

RITA SHESHRAO KULKARNI
Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2025.12.09 17:28:54 +0530

दिनांक– ०९/१२/२०२५
फुलंब्री.

(डॉ. आर. एस. कुळकर्णी)
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**फुलंब्री, जि.औरंगाबाद.**